## अनोखा मेळावा : म्युझिकल लँडस्केप्स अँड गॉडेस ऑफ म्युझिक ही संकल्पना

# वाद्यांच्या प्रदर्शनात स्त्रीच्या सन्मानाचा संदेश!

दत्ता खेडेकर



परदेशी वाद्यांची रसिकांना माहिती देताना रणजीत मक्कुनी.



**मुंबई :** विविध प्रकारच्या भारतीय आणि परदेशी वाद्यांना केवळ पाहण्यासाठीच नव्हे तर अनुभवण्यासाठी मुंबईकरांना अनोखी संधी आहे. कुलाबा येथील नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट्स येथे कलाप्रेमींसाठी 'म्युझिकल लँडस्केप्स अँड गॉडेस ऑफ म्युझिक' प्रदर्शन ७ डिसेंबरपर्यंत पाहता येणार आहे.

हे प्रदर्शन केवळ वाद्यांचेच नसून याबरोबरच स्त्रीचा सन्मान करण्याचा संदेशही देण्यात आला आहे. देवी सरस्वतीला विविध देशांमधील वेगवेगळ्या रुपात पूजले जाते. याच सरस्वतीच्या दागिन्यांमध्येही संगीत असते हे प्रसिद्ध कलाकार आणि संशोधक रणजीत मक्कुनी यांनी दाखवले आहे. त्यामुळे संगीताच्या आनंदाबरोबर देवीच्या महतीचे महत्त्वही रणजीत यांनी दाखवले आहे.

या प्रदर्शनात भारतीय सतार, तबला ही वाद्ये तर आहेतच याशिवाय थाई झायलोफोन, चायनिज पीपा, कोरियाचे कायगम ही वाद्येही ठेवण्यात आली आहेत. वीस भारतीय व शंभरहून अधिक परदेशी आणि स्वरचित अशी वेगवेगळी वाद्ये इथे पाहण्यास मिळत आहेत. शिवाय याचे वैशिष्ट्य म्हणजे नवीन वाद्ये बघण्याबरोबरच ती तुमच्या हालचालींनुसार वाजत आहेत असा वेगळाच अनुभव प्रेक्षकांना घेता येत आहे. पारंपरिक वाद्य आणि त्यावर आधारित नवीन वाद्य यांचा अनोखा संगमही येथे पाहायला मिळत आहे.

विशेष म्हणजे वाद्यांच्या या अनोख्या प्रदर्शनात प्रेक्षकच वादक होत आहेत. त्यासाठी त्यांना हातांच्या विशिष्ट प्रकारच्या हालचाली करायच्या आहेत. या हालचालींनुसार ही वाद्ये वाजत आहेत. म्युझिक सिंथेसिस या तंत्रज्ञानावर आधारित गाण्याचा टेम्पो बदलला तरी पीच तशीच राहते, असा संशोधनावर आधारित प्रयोगही मक्कुनी यांनी केला आहे.

या अनोख्या प्रदर्शनाबाबत बोलताना रणजीत यांनी 'लोकमत'शी संवाद साधला असता ते म्हणाले, 'गॉडेस ऑफ म्युझिक'च्या संकल्पनेमागचा मुख्य उद्देश म्हणजे तरुणाईचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला गेला पाहिजे. समाजात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांना आळा घातला गेला पाहिजे. स्त्री हेच आपल्या जन्माचे मूळ आहे, हे आपण विसरता कामा नये. म्हणूनच येथे देवी सरस्वतीची विविध रुपे, तसेच तिची वाद्ये आणि दागिन्यांमधून निर्माण होणारे संगीत याबद्दल लोकांना माहिती व्हावी, यासाठीच हे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. (प्रतिनिधी)